August 2021

E-ISSN : 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

**International E-Research Journal**

**Peer Reviewed, Referred & Indexed Journal**

**Special Issue 272**

## उदारीकरणानंतरचा भारत १९९१-२०२१



**विशेषांक संपादक :**
संदीप तुंडूरवार
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर
डॉ. शरद सांबारे
यशोदा गर्ल्स आर्ट्स अँन्ड कॉमर्स कॉलेज, नागपूर

**मुख्य संपादक :**
डॉ. धनराज धनगर

**विशेषांक सहसंपादक :**
डॉ. दिनकर चौधरी
डॉ. अमर बोंदरे
डॉ. बाळासाहेब जोगदंड
डॉ. बबीता सिंग
डॉ. संतोष डाखरे

**विशेष सहाय्य :**
प्रा. भास्कर वघाळे

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Scanned with CamScanner

August-2021 E-ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFEREED & INDEXED JOURNAL

Special Issue 272

## उदारीकरणानंतरचा भारत १९९१-२०२१

विशेषांक संपादक :
संदीप तुंडूरवार
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर
डॉ. शरद सांबारे
यशोदा गर्ल्स आर्ट्स अँन्ड कॉमर्स कॉलेज, नागपूर

मुख्य संपादक :
डॉ. धनराज धनगर

विशेषांक सहसंपादक
डॉ. दिनकर चौधरी
डॉ. अमर बोंदरे
डॉ. बाळासाहेब जोगदंड
डॉ. बबीता सिंग
डॉ. संतोष डाखरे

विशेष सहाय्य :
प्रा. भास्कर वघाळे

*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

*- Chief & Executive Editor*

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS

For Details Visit To : www.researchjourney.net

*Cover Photo (Source) : Internet

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 1000/-



Scanned with CamScanner

E-ISSN : 2348-7143
August - 2021

# उदारिकरणानंतरचा भारत : साध्य आणि साध्यता

संदीप तुंडूरवार
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर
डॉ. शरद सांबारे
यशोदा गर्ल्स आर्टस् ॲन्ड कॉमर्स कॉलेज, स्नेहनगर, नागपूर.
डॉ. राहुल बावगे
सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग सोलापूर.

**सारांश**

भारतातील उदारिकणाचा प्रांरभ ज्या बिंदूवर आधारलेला मानला जातो त्याचे विश्लेषण केल्यास उदारीकरणाचा स्वीकार ही बाब लक्षात येते. 1989 पासून केंद्रातील आघाडी सरकारच्या प्रयोगाचा प्रारंभ, आंतरराष्ट्रीय बाजारात तेल किंमतीत झालेली वृध्दी, वाढत्या लोकसंख्येतील रोजगार संधीचा अभाव, सकल उत्पन्नात फारशी वाढ न होता 3.8 टक्के एवढया दरावरील भारताचा विकास दर, राजकीय अस्थिरता यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेतील ताण वाढीस लागला. याचाच परिणाम म्हणून भारताला पुन्हा एकदा सोने 'बॅंक ऑफ इग्लंड' कडे गहाण ठेवण्याची पाळी आली. भारताच्या अर्थव्यवस्थेत एकप्रकारची चिंतामय स्थिती उद्भवल्याने कृतीशील व ठोस निर्णयाची अपेक्षा होती. 1991 मध्ये आघाडी सरकार कोसळयाने सार्वत्रिक निवडणुका घोषीत झाल्यात. निवडणूक काळात राजीव गांधींची हत्या झाल्याने थोडयाफार प्रमाणात का होईना कॉंग्रेस पक्षाला सहानुभूती मिळाल्याने पी. व्ही. नरसिंहराव यांच्या नेतृत्वात सरकार स्थापन झाले. त्यांच्या समोरील मुख्य आव्हान दोन प्रकारचे होते. एक म्हणजे आयात करण्यासाठी आवश्यक असणारे परकीय चलन काही महिन्यापर्यंतच पुरणारे होते व दुसरे म्हणजे अर्थसंकटाने वेढलेल्या देशाला बाहेर काढण्यासाठी ठोस निर्णयाची व स्वतंत्र अशा राजकीय इच्छेची गरज होती. तारण असलेले सोने, भडकलेल्या तेलाच्या किंमती, जागतिक बॅंकेचा दबाव, सिकुडणारी भारतीय अर्थव्यवस्था यांना बाहेर काढण्यासाठी 24 जुलै 1991 ला दुपारी लोकसभेत नवे औद्योगिक धोरण जाहीर करण्यात आले. पी. व्ही. नरसिंहरावाकडे उद्योगमंत्र्याची धुरा असतांनाही त्यांनी उद्योग राज्यमंत्री पी. जे. कुरियन यांना उद्योग धोरणाची घोषणा करावयास लावली व त्यात लायसेंस राज्य संपवित असल्याची आणि उद्योगक्षेत्र परकीय गुंतवणूकीकरिता खुली करीत असल्याचे घोषीत केलेत. त्याच दिवशी सायंकाळी अर्थमंत्री म्हणून डॉ. मनमोहन सिंग यांनी आपल्या अर्थसंकल्पीक भाषणाचा प्रारंभ करतांना व्हिक्टर हयुगो या फ्रेंच लेखकांचे विधान "एका दुरच्या आणि कष्टप्रद प्रवासाला आपण निघालो आहोत. ज्या संकल्पनेची वेळच आलेली असते तिला कुणी रोखू शकत नाही." उध्दृत करीत संभाव्य दिशा स्पष्ट केली. भारताची आर्थिक दिशा ही आता शासन नियंत्रणाशिवाय खुल्या बाजारात ठरवली जाईल. देशाच्या अर्थव्यवस्थेला उभार देण्याचे धोरण उद्योग व्यवस्थेवर सोपविल्या जाणार असल्याने सरकारला आता जनतेच्या मुख्य हिताच्या दृष्टीने प्रयत्न करता येतील. शिक्षण, आरोग्यसेवा, पायाभूत सुविधा, संरक्षण यावर लक्ष केंद्रित करणे सोपे होणार आहे. तत्कालीन सरकारने घेतलेल्या निर्णयाचे दोन भिन्न पडसाद भारताच्या आंतरराष्ट्रीय पातळीवर उमटलेत.

भारताने समाजवादाला झटकून भांडवली व्यवस्थेला राजाश्रय दिला व नवी ईस्ट इंडिया पध्दतीची गुलामगिरी आणली. विषमता वाढेल, रोजगार संपेल, भांडवली सत्ता प्रबळ होतील. डावे, मध्यममार्गी, उजवे, समाजवादी या सर्वच खेम्यांनी या निर्णयाला तीव्र विरोध केला. तर दुसऱ्या बाजूला



Scanned with CamScanner

भांडवली राष्ट्रांनी विशेषतः अमेरिका व नाटोप्रणीत राष्ट्रांनी या उदारिकरणाचे स्वागत केले. जगातील एक मोठी बाजारपेठ या निमित्ताने त्यांना मवराणार होती. या दोन परस्परविरोधी संमीश्र भावनांना सामोरे ठेवले तर जे वास्तव सामोर येते त्या आधारावर उदारिकणाचे साध्य व साध्यता तपासता येते.

3.8 टक्के असणारा विकासदर कोवीडपूर्व कालखंडात 6.9 टक्के वर पोहचला होता. भारताचे सकल उत्पन्न 2.1 ट्रिलीयन डॉलर्स नोंदविल्या गेले होते. ते 5 ट्रिलीयन डॉलर्सवर 2021 पर्यंत घेऊन जाण्याचे सुतोवाच करण्यात आले. भारताचे अंदाजपत्रक इतिहासात प्रथमतःच 24 लक्ष कोटीवर पोहचले. सेवाक्षेत्राचा वाटा 1947 मध्ये 2 टक्के होता तो आजमितीस 52 टक्के पोहचला. लायसेंस राज संपल्याने मोठया प्रमाणात उद्योग व्यवस्थेला बळ मिळाले व देशाच्या एकूण लोकसंख्येच्या 3 टक्के लोक अब्जाधिशाच्या यादित आलेत. जागतिक क्रमवारीतील पहिल्या पाच क्रमांकात तीन भारतीय आहेत ही उदारिकरणाची उपलब्धी मानली जाते.

रस्ते, संचार साधने, दळणवळण क्षेत्र, आरोग्य व्यवस्था, रेल्वे, विमान वाहतूक, माल वाहतूक यांच्यात झालेली वाढ, शहरांचे मेट्रोकरण, आवश्यक सेवांची उभारणी, शिक्षण क्षेत्रातील बदल या बाबी मागील तीन दशकात अभ्यासल्यास त्यातील आलेले अंतर समाजवादी रचनापेक्षा अधिक आहे. 1990 पूर्वी भारतीय माणसाचे वैयक्तिक उत्पन्न 9 हजाराच्या गटात होते ते 2020 मध्ये 90,000 झालेले आहे. उदारिकरणाने एका मोठया गरीब गटाचे संपन्न अशा मध्यमवर्गात परिवर्तन घडवून आणलेत. भौतिक वस्तूची उपलब्धता व त्याचा उपभोग या स्तरावरील भारतीय माणसाची झेप उदारिकरणाच्या मुल्यावर जोखली जात आहे. आयटी क्षेत्राने देशाच्या अर्थव्यवस्थेला दिलेला उभार उदारिकरणाची मोठी उपलब्धता माणली जाते. महामारीच्या काळात भारतीय अर्थव्यवस्थेत 24.7 टक्के वाटा आयटी क्षेत्राचा आहे व त्यातून मोठया प्रमाणात परकीय चलन उपलब्ध झालेत. गगनभरारीचे स्वप्न पाहू न शकणाऱ्या कुटुंबाचा यातील समावेश अर्थनितीची सकारात्मकता वर्तवणारी आहे. सोबतच राजकीय प्रक्रियेत वेगवान धोरण निर्मीती, अंमलबजावणी, धोरणातील अडथळे दूर करण्यावरील उपाययोजनेतील सक्रीयता हे या बाबी उदारिकरणाच्या सकारात्मक पैलूच्या अनुषंगाने लक्षात घेतल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर एमी वेव या विदुषीने उदारिकरणाचा एक वेगळाच भकास चेहरा सामोर आणत उदारिकरण संपत्तीच्या केंद्रीकरणाचे उदाहरण म्हणून कसे विकसित होत आहे याकडे लक्ष वेधले आहे. अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ जोसेफ स्टिग्लिटझ यांनी "नवउदारिकरणाच्या धोरणामुळे भांडवली पध्दतीतील केंद्रीकरण वाढत असून ते भयावह ठरत आहे, त्यांचा हा इशारा उदारिकरणाच्या साध्यतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारा आहे. उदारिकरण आणून तत्कालीन सरकारने समस्यांवर तोडगा काढत साध्य झाल्याचे सतोवाच केलेत, परंतु त्यातून उदभवलेला पेच साध्यतेबाबत शंका उपस्थित करणारा आहे.

**मुळ शब्द** – भारत, उदारिकरण, साध्य, साध्यता,

**गृहितक** – भारतातील उदारिकरणाने तत्कालीन मुख्य प्रश्नांचा निपटारा होण्यास मदत झाली, परंतु आर्थिक विषमता वाढीव लागली.

**प्रस्तावना**

आर्थिक विकासाचे नवे प्रारूप स्वीकारतांना दोन महत्वाचे मुद्दे तत्कालीन अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांनी ठेवले होते, त्यातील पहिला 'औद्योगिकदृष्टया विकसित अशा पाश्चिमात्य राष्ट्राच्या धर्तीवर भांडवलयन अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारलेले केंद्रिभूत धोरण होते.' व दुसरे म्हणजे 'जगाच्या अर्थव्यवस्थेत क्रांतीकारक बदल होत असल्याने त्याचा एक भाग बनणे व जुळवून घेणे अगत्याचे आहे.'1 मनमोहन सिंग यांच्या मांडणीतील मुद्यात भारताची खालावलेली अर्थव्यवस्था



Scanned with CamScanner

तिच्या समोरील यक्ष प्रश्न यांना उहापोह करण्याऐवजी मागील सत्तेने घेतलेली आधुनिकतेची कास अधिक खुली करणे विशेषतः भांडवल व तंत्रज्ञानाच्या बाबतीत व जागतिक अर्थव्यवस्थेशी जुळवून घेत विकास प्रक्रियेत भागीदारी वाढविणे यांचे प्रतिबिंब दिसून येते. येथील उद्योग रचनेची मानसिकता टिपताना मनमोहन सिंगांनी एका महत्त्वाच्या मुद्याकडे लक्ष वेधले आहे ते म्हणतात 'भारतातील उद्योग सांमती मनोरचना असणारे आहेत, त्यामुळे स्पर्धात्मक वातावरणात न येता सरकारी संरक्षणाचे कार्य करून नफा मिळवू इच्छितात' नव्या आर्थिक धोरणामुळे अपरिहार्यपणे त्यांना खुल्या स्पर्धेत उतरावे लागेल व जागतिक क्षेत्रात स्वतःला सिध्द करण्याचा प्रयत्न करावा लागेल. त्यातुन विकासाला चालना मिळेल व रोजगार वाढेल. अतिमतः अर्थव्यवस्था दृढ होईल असा होरा ते मांडतात. त्यांच्या मांडणीतील हे तत्व लक्षात घेतले तर 1991 मध्ये 'जीडीपी 3.8 टक्के होता तो 1994–95 मध्ये 7 टक्के , 1995–1997 मध्ये 7.8 टक्के, 1997–98 मध्ये 5 टक्के, 1998–2000 मध्ये 5.8 टक्के, 2016–17 मध्ये 8.20 टक्के,, 2017–18 मध्ये 7.2 टक्के, 2018–19 मध्ये 6.9 टक्के'2 या स्वरूपाचा दिसून येतो. तेव्हा भारताची अर्थव्यवस्था पूर्वीच्या तुलनेत गतीमान होत आहे असे म्हटल्या जात आहे. यातील मुख्यत्वे दोन बाजू उदारिकरणानंतरच्या भारतात दृष्टीपथास पडल्यास ज्या साध्य या दृष्टीने चर्चील्या गेल्यात, भारताला 1991 नंतर कधीही सुवर्ण तारण गेल्या तीस वर्षात गहाण ठेवण्याची नामुष्की ओढावल्या गेली नाही. त्याचप्रमाणे भारताची परदेशी गंगाजळी 612 बिलीयन डॉलर्सवर पोहचली आहे. याचा अर्थ कितीही मोठे आरिरथ्य आले तरी आयात करण्याबाबत व गरजा भागविण्याबाबत भारत स्वयंपूर्ण बनला आहे. तसेच भारताचे विद्यमान उत्पन्न 2.8 ट्रिलीयन म्हणजे 210 लक्ष कोटी आहे व 5 ट्रिलीयन डॉलर्सचे उद्दीष्ट ठेवण्यात आलेत. यावरून भारताच्या अर्थव्यवस्थेला जोखता येते. पहिल्या पंचवार्षिक योजनेत कृषी क्षेत्राकरिता असलेली मदत 354 कोटीची होती. ती आता 87,747 कोटीची झालेली आहे. एकाच क्षेत्रात आलेला व मोठा बदलाव विकसित अर्थव्यवस्थेची बाब स्पष्ट करणारी असल्याचे म्हटले जात आहे.

उदारिकरणाच्या संदर्भात जोखण्यात आलेला विचार तीन दशकांच्या पार्श्वभूमीवर अभ्यासल्यास तत्कालीन समस्यांचा निचरा करण्यास सहाय्यभूत ठरलेला असून भारत 2050 पर्यंत जागतिक पातळीवरील दुसऱ्या क्रमांकाची आर्थिक महासत्ता ठरू शकेल याची स्पष्टता यातून दृष्टीपथात येतांना दिसते.

24 जुलै 1991 ला उदारिकरणाच्या नव्या युगाचा प्रारंभ मांडतांना ज्या महत्वपूर्ण मुद्यांचा परामर्ष घेतलेला होता तो तपासणे मात्र साध्यतेच्या दृष्टीने महत्वपूर्ण आहे. भारत ज्या बाबीवर मात करू इच्छिते त्याची यादी देतांना हे स्पष्ट करण्यात आलेत की, आर्थिक निधीची कमतरता हे मूलभूत संकट होते. प्रचंड वित्तीय तूट होती. सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणूकीची कमी उत्पादकता, निर्यातीला संकुचित करणारी बंदीस्त अर्थव्यवस्था नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्याबाबतची येथील परंपरागत साचेबध्द मानसिकता यांना अव्हेरून आरोग्यक्षेत्र, शिक्षण, पायाभूत सेवा, संरक्षण यामध्ये आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्याकरिता उदारिकरण महत्वाचे असल्याचे पी. व्ही. नरसिंहराव शासनाने ठाम प्रतिपादले. मागील चार दशकातील विकासाची वाटचाल पुढे देशाच्या दृष्टीने सकारात्मक नसल्याने त्यात वेळीच परिवर्तन आणण्याची गरज मांडण्यात आली व त्यातून भारतीय विकासाचे अर्थमानचित्र जनतेसमोर ठेवण्यात आले. यामुळे 1976 मध्ये 42 व्या घटना दुरूस्तीने संविधानाच्या उद्देशपत्रिकेत आलेले 'समाजवाद' हे तत्व मागे गळून पडणार होते. कारण उदारिकरण हे मुक्त भांडवली व्यवस्थेचे प्रारूप असल्याने भांडवली व्यवस्थेत समाजवाद तत्व हे अंतर्भूत असणारे नव्हते या अर्थाने समाजवाद हे तत्व कालबाह्यतेच्या सीमारेषावर आलेले दिसून येते.



Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Special Issue – 272 : उदारीकरणानंतरचा भारत १९९१-२०२१
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
August - 2021

## उदारवाद आणि उदारीकरण संकल्पना

19 या शताकातील एक महत्वाची संकल्पना म्हणून उदारवाद अथवा उदारमतवाद गणल्या जातो. वस्तुतः ही संकल्पना आर्थिक कमी व राजकीय–सामाजिक अधिक आहे. या अर्थाने लोकशाहीला अनुरूप वा तिच्या विकासाला उत्तेजीत करणारी संकल्पना होय. डॉ. भा. ल. भोळे यांच्या मते ''उदारमतवाद दोन अर्थानी मांडता येतो. एक संकुचित तर दुसरा व्यापक, 1776 मध्ये प्रकाशित ॲडम स्थिमच्या वेल्थ ऑफ नेशन' या ग्रंथात – लेसे फेर (राज्याचा न्युनतम हस्तक्षेप) याचा उल्लेख असून तो बाजारव्यवस्था मुक्त स्पर्धेवर आधारित असेल तसे मानतो, हा मर्यादित वा संकुचित विचार आहे तर व्यापक अर्थाने तो मानसिक अभिवृत्तीचे निदर्शक असून बौध्दिक, नैतिक, धार्मिक, सामाजिक, राजकीय धोरणांचा सखोल वेध घेणारा आहे.''3 सामाजिक, राजकीय वा धार्मिक क्षेत्रात समता, अभिव्यक्ती, लिंगसमानता, मानवी हक्क यांना प्रवर्धीत करणारा या अर्थाने उदारवाद आहे. पाश्चात्य जगात उदारवादाची झालेली क्रांती लोकशाही शासनव्यवस्था सक्षम करण्यासोबतच उभारण्यात योगदान आहे तर साम्राज्यवादी वसाहतीच्या ठिकाणी अभिव्यक्तीला संवर्धीत करण्यास ती उपयुक्त ठरली.

तुलनेने उदारिकरणाची संकल्पना निखळ आर्थिक आहे. ''अर्थव्यवस्थांची सांगड जगातील अन्य देशाबरोबर घालणे, अर्थव्यवस्थेत बदल करीत मुक्त बाजारपेठांची निर्मिती व त्याकरिता नवनव्या कायद्याची निर्मिती करणे'' हे उदारिकरण अंतर्भूत आहे. गोपाळ राणे यांनी आंतरराष्ट्रीय व उदारिकरणाची अर्थव्यवस्था यात अंतर केले आहे. त्यांच्या मते आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्था वस्तूच्या निर्मितीचे मूळ दर्शविणाऱ्या असतात. उदा. मेक इन इंडिया, मेक इन जपान परंतु उदारिकरणातील बहुराष्ट्रीय कंपन्या जगातील वेगवेगळया ठिकाणच्या कुशल वस्तुंना एकत्रित करून आपली उत्पादने बाजारात आणतात व त्याला कंपनीचे नाव दिले जाते. उदा. आयबीएम, नॅस्ले, कोकाकोला इ. उदारिकरणात ज्या महत्वपूर्ण तथ्याचा समावेश होतो त्यात –

अ) लायसेंस पध्दती बंद करून कच्च्या मालाची आयात करण्याची मुभा देणे.
ब) सर्व प्रकारची कर सुलभता व उत्पादन प्रक्रियेला मान्यता.
क) उद्योगक्षेत्राला अनुपयुक्त ठरणाऱ्या कायद्यांना संपुष्टात आणणे.
ड) वस्तू व श्रमाचे आदान–प्रदान, कुशल–अकुशल कामगारांना बाजारपेठ उपलब्ध.
इ) उद्योग उभारणी करीता विदेशी संपत्तीला मुभा व त्यांची हिस्सेदारी.

उदारिकरणाच्या प्रक्रियेतील तथ्ये लक्षात घेतली तरी ती तद्दण अर्थव्यापी असून त्यात राजकीय घटकाला किमान कायदेनिर्मिती, अनुकुल रचना या अनुषंगाने जागा आहे. परंतु सामाजिक घटकांचा विचार त्यात प्रत्यक्षपणे उमटलेला दिसून येत नाही. उदारिकरणाचा ही मूलभूत तत्वे भारतीयांच्या व्यवस्थेत तशीच कायम आहेत. हे लक्षात घेतले तर उदारमतवाद किमान नागरिकांच्या स्वातंत्र्य, समता, न्याय घटकांशी नाते सांगतांना दिसतो. उदारिकरण मात्र या मूल्याऐवजी उद्योग आधारीत व्यवस्थेला सर्वोच्च पातळीवर ठेवतांना दिसून येतो. आर्थिकतेला विशिष्ट घटकांच्या माध्यमातून केंद्रित करणे हे एक प्रकारे 'नाही रे' वर्गाचे रूंदीकरण करणारे असून 'आहे रे' वर्ग अधिक सुखवस्तू बनेल याची दक्षता घेतलेली दिसून येते. मुख्य मुद्दा म्हणजे अर्थवादाच्या अवाजवी स्पर्धेत मात्र त्यांना नियंत्रित करण्यास राज्यव्यवस्था अपऱ्या ठरू लागल्या आहेत. अमेरिकेतील 6 कंपन्याचे एकत्रित उत्पन्न त्या देशाच्या अंदाजपत्रकापेक्षा अधिक आहे तर भारतातील 110 अब्जाधिशाचे एकत्रित उत्पन्न 2018–19 मध्ये भारत सरकारच्या अंदाजपत्रकापेक्षा 5 लक्ष 50 हजार कोटीने अधिक होते. या वर्षीच्या अंदाजपत्रकातील राशी 24 लक्ष 42 हजार 213 कोटी होती तर अब्जाधिशाचे एकत्रित उत्पन्न 30 लक्ष कोटी ऐवढे होते. 138 कोटी लोकसंख्येतील 110 लोकांचे एकत्रित उत्पन्न अंदाजपत्रकापेक्षा अधिक



Scanned with CamScanner

E-ISSN : 2348-7143
August - 2021

असणे आर्थिक विषमतेपेक्षा सामाजिक विकलांगतेचे बटबटीत स्वरूप होय. नव्या हिप्पो क्रिटो चलनाबाबतीतला जगभरातील सावळा गोंधळ व महामारी काळात शेअर्स बाजाराने घेतलेली उसळी पाहू जाता राज्यव्यवस्था अभावग्रस्त झालेल्या दिसतात.

भारताचे रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तीकांत दास यांनी अलिकडे एका मुलाखतीत रिझर्व्ह बँक शेअर्सच्या उसळीवर नियंत्रण ठेऊ शकत नाही हे केलेले वक्तव्य केंद्र शासनाचा उद्वेग स्पष्ट करणारा आहे. परिणामतः उदारिकरण लोकशाहीच्या मुल्यांना कळत—नकळत अवकाश निर्माण करू देत असतो ही मांडणी राजकीय अर्थाने समावेशक नसून ती अर्थ रचनेला प्रोत्साहन करते हे लक्षात घेतले तर भारतातील  उदारिकरणातील साध्य व साध्यता यातील अंतर तपासता येणे शक्य होते.

## उदारिकरणाचे साध्य

उदारिकरणाचा स्वीकार करताना अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांनी जो आशावाद नोंदवला होता तो साध्य प्राप्तीच्या दृष्टीने तपासने महत्वाचे आहे. उदारिकरणापूर्वी भारताच्या मंद अर्थव्यवस्थेबाबत दोन युक्तीवाद केले जायचे. त्यातील पहिला लायसेंसराज व लालफितशाही असा सरकारी खाक्या पध्दतीचा होता तर दुसरा भारतातील विकासदराला 'हिंदु ग्रोथ रेट' या शब्दाने हिणवल्या जायचे. कारण तो 1947 ते 1991 या कालावधीत कधीच 3.8 टक्के वर गेलेला नव्हता. या युक्तीवादाला लक्षात घेतले तर उदारिकरणाचे हे दोन्ही लांछन पूर्णतः पुसून टाकले आहेत आणि महत्वाचे म्हणजे सदोष असले तरी शिक्षण, आरोग्य, संरक्षण यांच्यात मोठी आघाडी होणे शक्य झाले. विशेषतः ही बाब त्या पार्श्वभूमीवर अधिक ठळकपणे दिसून येते की, युपीए 2 च्या काळात मोठया प्रमाणात भ्रष्टाचाराचे आरोप करण्यात आले. त्यामुळे-देशाच्या विकासाचे मोठे नुकसान झाल्याचा दावा करण्यात आला. पेट्रोल, टु जी स्पेक्ट्रम, कोळसा खाण घोटाळा हे ठळक उदाहरणे होत. या विपरीत वातावरणात जीडीपी मात्र माघारल्या गेला नाही.

महत्वाच्या सांख्यिकी आकडेवारीवर दृष्टीक्षेप टाकला तरी काही बाबी स्पष्टपणे समोर येतात. परकीय गंगाजळ 612 बिलीयन डॉलर्सवर गेली, कोवीड काळात एका तिमाहीमध्ये विकासदर – 24 असा नोंदविला गेला असताना तेव्हा जिओ कंपनी हजारो कोटी रू. गुंतवणूक करीत होता. अजून दोन मोठे बदल लक्षात घेतले पाहिजेत ते म्हणजे भारतातील काही वजनदार कंपन्याची जी दांडगाई होती ती संपली व दुसरे म्हणजे ज्या बहुराष्ट्रीय कंपन्यांनी भारतात 1991 मध्ये गुंतवणूक करताना बऱ्याच अटी लादल्या होत्या त्या कंपन्या आता भारत सरकारच्या अटीवर काम करायला तयार झाल्यात. ॲमेझॉन, ट्विटर, गुगल, फेसबुक, वॉलमार्ट या कंपन्या त्याच्या प्रातिनिधीक उदाहरण म्हणून लक्षात घेतल्या पाहिजेत. तत्कालीन ज्या विरोधीपक्षांनी सत्तेवर आल्यानंतर बहुराष्ट्रीय कंपन्यांची गुलामगिरी व मक्तेदारी मोडीत काढू असे म्हटलेत ते सत्ताधारी झाल्यानंतर परतीचे दोर कापू शकले नाहीत उलट विमा, रेल्वे,  हवाई क्षेत्र, माध्यमक्षेत्र, शिक्षण, दळणवळण, मेट्रो या विभिन्न क्षेत्रातील हिस्सा 22 टक्के ते 78 टक्के प्रतिशत असा वाढविला हे उदारिकरणाचे वास्तव येथील डावे, उजवे, समाजवादी यांना टाळणे वा नाकारणे शक्य झाले नाही. स्वदेशी आत्मनिर्भरतेचा हेका कितीही मोठा असला तरी उदारिकरणाचे चक्र उफराटे फिरविता येणार नाही, तसे झालेच तर भारत मागास देशाच्या यादीत फेकल्या जाईल.

बायबल मधील 'वडिलांच्या पापाकरिता त्यांच्या मुलांचा बळी देता येणार नाही' हे वचन गृहीत धरले तर अर्थवादाला विपरीत नेणे म्हणजेच तीची गती संपुष्टात आणणे होय. हे मात्र आता शक्य होणार नाही.



Scanned with CamScanner

E-ISSN : 2348-7143
August - 2021

1947 मध्ये भारतातील सेवाक्षेत्राचा वाटा 2 टक्के होता. 1990 मध्ये तो 8 टक्के वर गेला. तर 2021 मध्ये तो 5 टक्के वर आलेला आहे. तर विमा क्षेत्राची भागीदारी 1947 मध्ये 9 टक्के होती, ती सध्या पहिल्या पाचमध्ये आहे. मुंबईतील 1992 ची दंगल, 26/11 च्या घटना वेळेही शेअर मार्केट 1 दिवसाच्यावर बंद राहिले नाही. उलट अमेरिकेतील 9/11 च्या घटनेनंतर तब्बल एक आठवडा शेअर बाजार बंद होता. भारत नव्या आव्हानांना पेलतानाच उदारिकरणातून येणाऱ्या उद्योगकेंद्री अर्थव्यवस्थेबाबत अधिक उत्सुक बनल्याचे स्पष्ट होते. 'सोर्स हॅज बुक ऑफ स्टॅटिटिक्स' प्रमाणे जागतिकीकरणाच्या पूर्वी भारताचा जीडीपी दरवर्षी 5.8 टक्के ने वाढत होता, तर तो नंतर 6.23 टक्केने वाढता. 2008 ते 2017 च्या दरम्यान तो 7.06 टक्केने वाढला."4 जीडीपी दरातील तुलनात्मक वाढ व दरवर्षी होणारी वाढ ही बाब तपासली तरी उदारिकरणानंतर वृध्दीदर वाढत चालल्याचे दिसून येते. तो कमी पण होतो जसा तो 2018–19 मध्ये झाला. मात्र 1 टक्के वाढ जेव्हा होते तेव्हा 10 लक्ष रोजगार निर्माण होते. हे सूत्र मांडण्यात आलेले आहे ते लक्ष गृहित धरले तर वाढत्या जीडीपीने रोजगार संधी निर्माण केल्याचे दिसून येते. उदारिकरणापूर्वी महिलांच्या व बालकांच्या मृत्यूचे प्रमाण जे चिंताजनक होते ते घटून 1 लक्ष माता मागे 130 व 5 वर्षाखालील मुलांचे प्रमाण दरहजारामागे 12 असे झालेले आहे. किमान आरोग्य परंपरेतील हा बदलाव व सर्वशिक्षा अभियानमुळे विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढीस लागले असून अनिवार्यता व मोफत शिक्षणाच्या तरतूदीमुळे 14 वर्षाखालील वयोगटातील 88 टक्के विद्यार्थी शाळेपर्यंत पोहचत आहेत. भारताच्या जनगणनेची आकडेवारी अभ्यासली तर ही बाब पुरेशी स्पष्ट होते. शिक्षण क्षेत्रातील सुविधांची वाणवा लक्षात घेता त्यावरील आलेले प्रयत्न पुरेसे बोलके आहे. स्वित्समधील ऑक्सफॅमने दिलेल्या अहवालानुसार 1991 पूर्वी भारतातील अब्जाधिशांची संख्या 11 होती. ती आज 119 झालेली असून त्यात 9 महिला आहेत. या अब्जाधिशांची एकत्रित संपत्ती भारताच्या एकूण सकल उत्पन्नापेक्षा अधिक झालेली असून विविध क्षेत्रातील भांडवलाच्या गुंतवणुकीमुळे रोजगाराभिमुख अर्थव्यवस्था म्हणून भारत उभारी घेत आहे. उदारिकरणाच्या स्वीकारोतीकधील जे साध्य उपेक्षिल्या गेले होते. त्याला यश मिळाल्याचे चित्र आर्थिक आकडेवारीवरून पुरेसे स्पष्ट होते.

### उदारिकरणाच्या साध्यतेवरील मर्यादा

साध्यता याचा अर्थ साध्यत्वानंतरची शाश्वतता अथवा चिरंतनत्व होय ती जर कायम नसेल तर साध्यात परिवर्तन येऊन जुनीच व्यवस्था वा जुनी स्थिती कायम राहू शकते. उदारिकरणाची साध्यता त्या अर्थाने विश्लेषीत होणे वर्तमानाची गरज होय. भांडवली व्यवस्थेबाबतचा मार्क्सप्रणीत संदर्भ बिंदू व विश्लेषणकर्त्याकडून आलेला संदर्भबिंदू पडताळून पाहणे मर्यादेच्या दृष्टीने अधिक महत्वाचा आहे. मार्क्सच्या मते 'संपत्तीचे निर्माते कामगार व शेतकरी असताना हा बिंदू मात्र उद्योगक्षेत्राकडे वळला आहे' तर भांडवलशाही सामान्य नागरिकांकडून दोन मुख्य भूमीकांची अपेक्षा करीत असते. एक म्हणजे आम्ही बोलावू त्यावेळी कामगार, कर्मचारी होते व दुसरे आमच्या वस्तुमाला सेवांचा तो उपभोक्ता म्हणजेच खरेदीदार असला पाहिजे. उदारिकरणाच्या एकूणच मनोरचनेत हे तत्वाधिष्ठान अधिक प्रमाणात विस्तारल्या गेले आहे. भारतासारख्या देशाती संपत्तीच्या दोन प्रमुख समस्या आहेत. एक म्हणजे ती निर्माण करणे व दुसरे म्हणजे त्याचे वितरण. देशांतर्गत संपत्ती निर्माण हे आव्हान ठरल्याने बहुराष्ट्रीय कंपन्यांना भारताची बाजारपेठ खुली करण्यात आली. उदारिकरणाचे समर्थक मात्र ही बाब अमान्य करतात व त्या पुष्टार्थ समर्थनार्थ बाजू मांडताना 1977 पासून याबाबत विचार कसा सुरू होता याचे सारगर्भ वर्णन करताना दिसतात. 1977 मध्ये जनता राजवटीतील अर्थमंत्री हिंरूभाई पटेल यांनी भारताचे आर्थिक धोरण कालबाहय झाल्याने ते बदलविण्याची गरज मांडली होती. 1960 च्या तुलनेत



Scanned with CamScanner

E-ISSN : 2348-7143
August - 2021

1977 मध्ये दारिद्रय रेषेखालील प्रमाण वाढले गेले होते. ते जवळपास 44.5 टक्के होते. 2019 मध्ये त्याची नोंद होताना 15 टक्के नोंदविली आहे. व्ही. पी. सिंग सत्तेवर असताना त्यांनी मलेशियाचा दौरा केला होता तेथील विकासगती व आधुनिकीकरण पाहून त्यांनी भारतात परत आल्यानंतर मॉटेकसिंह अहुलवालीया यांना बोलावून घेतले व आराखडा तयार करण्यास सुचविले. त्यातूनच "M Document" अस्तित्वात आले. या आधारावरच उदारिकरणाचा पाया रचला गेला. भारतातील उदारिकरणाच्या टप्प्यात अधिक लोकाभिमुख अर्थसंकल्प 1990–91 चे 'नवीन आर्थिक धोरण' 1997–98 मधील डॉ. मनमोहन सिंग यांचा "Dream Budget" 2000-01 मधील पी. चिंदवरम यांचा "Welfare Budget" तर यशवंत सिन्हा यांचा वाजपेयीच्या काळातील 'गरीबी मुक्तता, विकास, संरक्षण विषयक अर्थसंकल्प मानला जातो. ज्यातून आर्थिक व्यवस्थेला उभारी देण्याचा मुक्त प्रयत्न करण्यात आला. यामधून जी सातत्याने धोरणात्मक बाब मांडल्या गेली ती म्हणजे भारताने दवावातून निर्णय घेतलेला नसून देशाच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्थानाला भक्कम करण्याचा तो निर्णय होता. तीन दशकाच्या वाटचालीवर दृष्टीक्षेप टाकला तरी साध्याची शाश्वतता नेमकी काय व साध्यतेवरील मर्यादा यांचा ताळेबंद बाहेर येतो. सेवाक्षेत्राचा अपवाद वगळता रोजगारात आलेली तूट जी आज 14.5 कोटीची वर्तवल्या गेली आहे. शेतीक्षेत्रात मोठी तूट झालेली असून ती 12.5 टक्के वर आलेली आहे. निर्यातीत झालेली घट 2017 मधील 17.6 टक्के एवढी आहे. उत्पादन क्षेत्रात 39.3 टक्के, बांधकाम क्षेत्रात 50.3 टकके, व्यापार, वाहतूक, हॉटेल्स यात 47 टक्के घट झालेली आहे. CMIE सेंटर फॉर मॉनिटरिंग इन इंडियन इकॉनॉमीने 121 दशलक्ष रोजगार गेल्याचे नोंदविले. भारत जी–20 गटातील एकमात्र देश आहे ज्याचा-जीडीपी सरत्या वर्षात उने असा निच्चांकी गणल्या गेला. भारताचे 2007 मध्ये कर्ज 21 लक्ष कोटी होते जे उत्पन्नाच्या 14.5 टक्के होते ते 2017 मध्ये 63 लक्ष कोटी डॉलर्स झाले उत्पन्नाच्या ते 210 टक्के आहे. हे संदर्भ तपशील पाहिल्यास उदारिकरणाने निश्चित काय कमावलेत याचे वास्तववादी चित्रण सामोरे येते. एक बदलाव अर्थ व राजकीय क्षेत्रात घडून आला. अब्जाधिश जसे वाढलेत तसे निवडणुकांचे प्रारूप बदललेत. राष्ट्रपतीच्या निवडणुकीपासुन तर ग्रामपंचायतीच्या सामान्य सदस्यांच्या निवडीकरिता 1991 नंतर सातत्याने खर्च करावयाच्या रकमेत मोठे फेरबदल होऊ लागलेत. 2014 नंतरच्या सर्वच निवडणुका "Event Management" असा तोंडवळा धारण केलेल्या आहेत. 1990 पूर्वीच्या निवडणूक प्रक्रियात 2–एम चा बोलबाला जाणवत नव्हता तो M = Money व M = Musale यांचा दिसून येतो आहे. सर्व अत्याधुनिक साधनांचा वापर हे निवडणुकींचे वैशिष्टय ठरलेत. कम्युनिस्टाना पण तग धरून राखण्याकरिता अर्थव्यवस्थशी साटेलोटे ठेवणे हे अपरिहार्य झालेत, ही उदारिकरणाची साध्यतेवरील मोठी मर्यादा आहे. कौटिल्याच्या भाषेतील ''मंत्रपूर्वहः सर्वारंभ'' ही उक्ती लक्षात घेतली तर राजकीय धुरीणांना निर्भय बनविण्याकरिता सकस अशा सल्लागारांची गरज असते. उदारिकरणात नवे सल्लागार अर्थरचनाना गती देणारे व त्याची 'री' ओढणारे आहेत. हे चित्र अल्प व बहुसंख्य यातील दरी वाढविणारे होय.

उदारिकरणाच्या प्रक्रियेत लिंगभेदभाव संपून समतेचा व्यवहार होतो असे म्हटल्या जाते. भारतातील स्थिती किती विपरीत हे पुढील तक्त्यातून आढळते.

| अ.क्र. | घटक | 2014 | 2015 | 2016 | 2017 | 2018 | 2019 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पुरूष | 71 | 70 | 68 | 71 | 77 | 75 |
| 2 | स्त्री | 29 | 30 | 32 | 29 | 23 | 25 |



Scanned with CamScanner

भारतीय अर्थव्यवस्था 5 ट्रिलियन करण्याच्या दिशेने केलेल्या घोषणा काळातील हे चित्र लिंग भेदभावाला वाढविणारे असून समतेच्या वाटचालीत मर्यादा उजागर करणारे आहे. महिलांना वाटा सातत्याने हेलकावे खाताना दिसून येतो आहे. ही स्थिती केवळ रोजगार संदर्भातच नाही तर अन्य क्षेत्रातही भीषण आहे. भारत 144 देशाच्या तालीकेत 108 व्या क्रमांकावर आहे. 1991 नंतरचे उदारिकरण नेमके कोणत्या घटकास अनुकूल ठरते हे यातून स्पष्ट होते.

| क्षेत्र | वर्ष (2017) | वर्ष (2018) |
|---|---|---|
| आर्थिक सहभाग | 139 | 142 |
| शिक्षण | 112 | 114 |
| आरोग्य आणि सुदृढता | 141 | 147 |
| राजकीय सबलीकरण | 15 | 19 |
| श्रमशक्ती सहभाग | 139 | 138 |
| वेतनातील समानता | 80 | 72 |
| लोकप्रतिनिधी | 114 | 130 |
| व्यावसायीक आणि तंत्रज्ञ | 118 | 133 |
| संसदेतील महिला | 116 | 123 |
| मंत्रीपदावरील महिला | 76 | 77 |

(स्त्रोत – जागतिक आर्थिक मंच)

उदारिकरण केवळ विषमतेची दरीच रूंदावते असे नव्हे तर तो लिंग भेदभाव, वर्गीयरचना, दर्जा यांनाही विभाजत असतो. यातले प्रश्न आर्थिक नव्हे तर सामाजिक आहेत. अच्युत गोडबोलेच्या मते 'उदारिकरणानंतर झालेली सरासरी आर्थिक वाढ 6.23 टक्के जी पूर्वी 5.38 टक्के होती. म्हणजे अधिक वाढ झालेली नाही. उलट गरिबी निर्मूलनाचे प्रमाण जे 1991 पूर्वी 0.85 टक्के होते ते 1991 नंतर 0.7 टक्के ने केवळ घटला याचा अर्थ फारसा फरक पडला नाही. पॉल क्रुगमनने विषमतेची दरी दर्शविताना म्हटलेत अमेरिकन 1 टक्के लोकांकडे 1980 नंतरच्या काळात 42.2 टक्के शेअर्स होते ते वाढत जाऊन 71.4 टक्के वर पोहचलेत. ब्रँको मिलानोव्हिक या वर्ल्ड बँकेच्या अर्थतज्ञाच्या मते 'जगातल्या 1 टक्के लोकांकडे जेवढी संपत्ती आहे तेवढी जगातल्या तळातील 57 टक्के लोकांची संपत्ती एकत्रित केली तरी होते. जगातल्या पहिल्या 3 श्रीमंत लोकांची संपत्ती 48 गरीब देशाच्या उत्पन्नाच्या बेरजेपेक्षा अधिक आहे. जगातील 225 लोकांचे उत्पन्न जगातल्या 47 टक्के लोकांच्या उत्पन्नाएवढे आहे'5 उदारिकरणाचे देशीय व जागतीक वास्तव लक्षात घेतले तर या व्यवस्थेने जनतेच्या मानसिकतेवर चंगळवाद भोगवाद, चकचकीत जगाचा ठसा उमटविण्यात जी यशस्वीता प्राप्त केली त्यातून साध्यतेच्या मर्यादा दुर्लक्षित झालेल्या आहेत. ब्रँकोच्या निष्कर्षानुसार जगातील 225 श्रीमंत व्यक्तीवर केवळ अधिकचा 4 टक्के कर वाढवला तर जगातील प्रत्येकाला पुरेसे अन्न, शिक्षण, आरोग्य मिळू शकते. डॉ. मनमोहन सिंगानी उदारिकरणाची भलावन करताना जी मांडणी केली ती श्रीमंतावर अधिक कर आकारणी केल्याशिवाय भारतात प्रत्यक्षात येणे शक्य नाही. असे उदारिकरण 'आहे रे' या वर्गसुत्राला अधिक घष्प करणारे ठरेल.

**महामारीच्या काळातील उदारिकरणाचे वास्तव**

कोवीड–19 या महामारीने जगभरासमोरच त्याने अनेक प्रश्न उभे केलेत. ते केवळ आर्थिक अशाच स्वरूपाचे नाहीत तर वैश्विकता, धर्म, शिक्षण, सहिष्णूता, मानवता यांच्या बाबत अधिक गहिरे राहिलेले आहेत. प्रत्येकच देशांनी त्याची भरपाई आर्थिकतेच्या आधारावरच जोखली. विशेषतः परिणाम



Scanned with CamScanner

व उपाययोजनाबाबत अर्थ हाच केंद्रबिंदू राहिला. आर्थिक बाबतीत प्राचीन काळातील संवादात अनेक संदर्भ आलेले आहेत, त्यातील दोन संदर्भ डॉ. अमर्त्य सेन यांनी नमूद करताना दोन भिन्न प्रवाहावर लक्ष वेधले आहे. बृहंदराण्यक उपनिषदात मैत्रेयी अपने पती याज्ञावल्क्य से चर्चा करते वक्त वह पुछती है ''यदी सारी धनसंपन्न सुविधा की वह एक मात्र स्वामिनी हो जाए तो उसे अमरत्व की प्राप्ती हो जाएगी'' याज्ञवल्क्य 'नही' ऐसा उत्तर देते है'6 तात्पर्य धन से अमरत्व या विश्व की पूरी बागडोर हाथ मे नही आ सकती. याज्ञवल्क्यचे उत्तर ऐहिकवादी नसून पारलौकीकतेशी निगडीत आहे. दुसरा संदर्भ ॲरिस्टॉटलच्या ''निकोमॅकीयन नीतिशास्त्र'' यातील उध्दृत केला आहे. ॲरिस्टॉटल म्हणतो ''धन वह वस्तू नही है जिसकी हमे खोज है, यह तो मात्र कुछ अन्य विषयो में सहायक ही हो सकता है'' ॲरिस्टॉटल एकाचवेळी ऐहिक व पारलौकीक मांडणी करताना दिसतो. त्याच्या मांडणीतील दुसरा भाग महत्वाचा आहे. धनाची गरज आहे ती व्यक्तीच्या सुख व कल्याणाबाबत. ही भूमिका महामारीच्या काळात मुख्यत्वे जाणवू लागली. भांडवली, मध्यम, साम्यवादी देशांनी गरज वा अपरिहार्यता म्हणून आपला राजकोष वेगवेगळया कामासाठी खुला केला. देशांतर्गत जीडीपी कोसळल्या गेल्यानंतरही अन्न, औषधे, रोजगार, स्वच्छता यांच्यावर मोठया प्रमाणात खर्च करण्यात आला. अमेरिकेने आपल्या जीडीपीच्या 21 टक्के, जपानने 27 टक्के, जर्मनी 13 टक्के, इंग्लड 17 टक्के तर भारताचा खर्च 23.70 हजार कोटी राहिला. जो जीडीपीच्या केवळ 10 टक्के आहे. त्या खर्चाच्या ताळेबंदावर सहज लक्ष टाकले तरी मदतीची वाणवा दिसून येते. अवाढव्य लोंकसंख्येला पुरवठा होईल इतकी स्थिती नाही हे गृहित धरले तरी याच दरम्यान भारतात अब्जाधिशांची वाढलेली संख्या, पलायन केलेले अब्जाधिश, बँकाचे खाजगीकरण, खुल्या बाजारातील अर्थव्यवस्था सावरण्याकरिता केलेली उचल लक्षात घेतली तर उदारीकरणाची 'सूज' लक्षात येते. बँकाच्या वित्तीय कंपन्याची बुडीत कर्जे 21 टक्के झालेली आहे. नादारीत गेलेली रक्कम 1,53,000 कोटीवर पोहचली. भारतातील 5 हजार कोटयाधिशांनी या काळात कर्जे बुडवून सुरक्षित देशात पलायन केले. 2019 पर्यंत बुडविलेल्या कर्जाची रक्कम 58,400 कोटी होती. ती मार्च 2021 पर्यंत 62,000 कोटीच्या वर पोहचली आहे. तर मनीलॉडरिंग मार्फत चुकवलेली रक्कम 83 अब्ज डॉलर्स आहे. अर्थव्यवस्थेला उभार देण्याकरिता केंद्राने राज्यांना खुल्या बाजारातून उचल करण्याची मुभा दिलेली आहे. तर केंद्र सरकारने 12.5 लक्ष कोटी कर्जाची उचल करीत असल्याने देशावरील कर्ज 67 लक्ष 5 हजार कोटीवर जाईल. 2014 ते 2021 पर्यंत जवळपास 28,000 कोटयाधिशांनी भारतातून पलायन करून दुसऱ्या देशांमध्ये आपले उद्योग उभे केले आहेत. तर दुसऱ्या बाजूला भारतातील उद्योग क्षेत्रात मजुरांच्या रोजगारावर आघात झालेला असून शेतीक्षेत्रही घटत चाललेले आहे व सोबतची कृषी क्षेत्रातील दयनीयता लक्षात घेता शेतीतील रोजगार आणि अवलंबून असणारा जनसगूह पाहू जाता उदारिकरणाने साध्य कमी तर साध्यतेवरील दाव अधिकचा वाढविलेला दिसतो. जागतिक अर्थव्यवस्थांची समिक्षा करता निरूएल रुबीनी या अर्थतज्ञाने दिलेला इशारा गंभीर स्वरूपाचा आहे. महामारीमुळे अर्थव्यवस्थेचे प्रारूप K या आद्यक्षरासारखे बनत आहे. ज्यातील K मधील उभी रेषा धनाढय उद्योगपतीचे प्रतिक असून यातील एक तिरकी रेषा अल्प अब्जाधिशाचे प्रतिक असून दुसरी खालील तिरकी रेषा वंचीतता असलेल्या वर्गाचे प्रतिक होय हे समजून घेतले तर महामारीमुळे उदारिकरण कसे संकुचित बनत आहे याचा प्रत्यय जग घेत आहे. भारतात तर ही स्थिती प्रचंड वेगाने विषमता धारण करीत आहे. एमी वेब यांनी या काळातील विशिष्ठ उद्योगांचे वाढलेले केंद्रिकरण व मक्तेदारी याकडे लक्ष वेधले आहे. ॲमेझॉन कंपनीने कोवीड काळात भारतात 20 हजार कोटीची अधिक गुंतवणूक केली तर जिओ कंपनीने हजारो कोटी दूरसंचार क्षेत्रात रोवून महामारी स्थितीचा फायदा उचलला. जगातील GMAFIA व



Scanned with CamScanner

E-ISSN : 2348-7143
August - 2021

BAT या अमेरिकन व चीन कंपन्याची समिक्षा करतांना त्यांनी हाच मुद्दा गृहित धरला आहे. महामारी काही उद्योगाकरिता इष्टापती ठरली आहे. त्यातून Google, Microsoft, Amazon, Facebook, IBM, Appale व Balju, Alibaba, Tanset या कंपन्यांनी आपल्या अटी व शर्तीच्या आधारावर धमकाविण्याचा प्रयत्न केला ही स्थिती पाहू जाता महामारीमुळे उदारिकरणाची काळी बाजू ठराठरीतपणे पुढे येताना दिसतेय हे चित्र आशावादाला अनुरूप नाही.

### गृहितकाची पडताळणी

भारतातील उदारिकरणाने तत्कालीन मुख्य प्रश्नांचा विचार होण्यास मदत झाली, परंतु आर्थिक विषमता वाढीव लागली. संशोधन निबंधातील तथ्ये, विश्लेषण, संदर्भ पाहू जाता गृहितक सिध्द झाल्याचे दिसून येते.

### मुल्यांकन

उदारिकरणाच्या बाबतीत जे दोन परस्पर विसंवादी चित्र समोर येतात त्यांच्या मनोभूमिका तपासण्याची गरज आहे. वाढत्या लोकसंख्येचे जगण्याचे प्रश्न सोडविण्याकरिता उद्योगकेंद्री व्यवस्था उभी होण्याची गरज आहे. हा युक्तीवाद सरळसरळ नाकारता येत नाही. जगातील एक भूभाग जो टोळीवादाने ग्रासलेला आहे तिथे प्रश्नस्वरूप भिन्न आहे टोळी वा घराण्यांची सत्ता हे समीकरण आहे. परंतु संविधानिक व्यवस्था असणाऱ्या देशामध्ये जनतेचा दाब अधिक असतो त्यामुळे लोककल्याणार्थ पर्याय देणे अपरिहार्य ठरते व अशा स्थितीत भांडवली व्यवस्था प्राधान्याने लक्षात घेतल्या जातात. परंतु दुसरा चिकित्सकतेचा युक्तीवाद गृहीत धरणे गरजेचे आहे. भांडवली व्यवस्थांच्या केंद्रिकरणातून मोठया प्रमाणात विषमता वाढते ही वस्तुस्थिती अनेक संदर्भातून पडताळून पाहिली तर त्याचे वास्तव भयावह स्वरूपात समोर आलेले आहे. जनतेला पैशाचे आकर्षण दाखवून सत्ता प्राप्तीचा खेळ करणे हे सुध्दा भांडवली व्यवस्थाची मनोभूमीका होय. हे पाहता स्वित्स बँकेतून आणल्या जाणाऱ्या पैशातून प्रत्येकाला किमान 3 लक्ष रू. मिळतील ही घोषणा संपत्तीच्या विषम स्थितीला व्यक्त करणारी आणि म्हणूनच अधिक आकर्षण असणारी ठरली. भारतासारख्या देशात उदारिकरणानंतर स्वित्स बँकेमधून येणाऱ्या पैशाची आस घेऊन बसणारी लोक मोठया प्रमाणात आढळलीत. त्यावेळी उदारिकरण फोल ठरल्याचे स्पष्ट होते. केंद्र व राज्यांनी गेली दोन दशकापासून सार्वजनिक क्षेत्रातील रोजगार भरती जवळपास 2 ते 5 टक्के वर आणलेली आहे व कंत्राटी व्यवस्था उभी करण्यास प्रोत्साहन दिलेत. ज्यात रोजगार शाश्वतता नाही. परिणामी शेती व सार्वजनिक क्षेत्र याची सारखीच दुरावस्था झालेली आहे. शिक्षण, आरोग्य हे महत्वाचे क्षेत्र तर मोडीत निघाल्यात जमा आहे. या स्थितीत मार्क्सवाद अधिक समिक्षेच्या पातळीवर आणून संभाव्य धोक्यांना दिग्दर्शित करतो. परंतु चीन साम्यवाद सोडून भांडवली व्यवस्थाचा अग्रकर्ता बनू लागला तेव्हा उद्योगकेंद्री व्यवस्थाचे एककल्ली वर्तन अधिक भिडस्तपणे सुरू असलेले दिसून येते. त्यामुळे उदारिकरणातून अपेक्षित असलेले साध्य यापर्यंत पोहचता येते, परंतु साध्यत्वाच्या दृष्टीने तिच्यातील एककल्लीपणा समाज व राज्यव्यवस्थेला उचलून धरून शाबूत राखण्यास उपयुक्त नाही.

### संदर्भग्रंथ

1. नववसाहतवाद आणि आधुनिक भारत, गोपाल राणे, कालिंदी प्रकाशन, मुंबई, 1995, पृष्ठ क्र. 274.
2. भारतीय समाज, राम अहुजा, रावत पब्लिकेशन, दिल्ली, 2019, पृष्ठ क्र. 113



Scanned with CamScanner

3. आधुनिक भारतातील राजकीय विचार, डॉ. भा. ल. भोळे, पिंपळापुरे पब्लिकेशन, नागपूर, 2003, पृष्ठ क्र. 386.
4. अनर्थ, विकासनिती सर्वनाशाच्या उंबरठयावर, अच्युत गोडबोले, मनोविकास प्रकाशन, मुंबई, 2019, पृष्ठ क्र. 28.
5. अर्थात, अच्युत गोडबाले, राजहंस प्रकाशन, पुणे, 2013, पृष्ठ क्र. 421.
6. आर्थिक विकास और स्वातंत्र्य, अमर्त्य सेन, राजपाल प्रकाशन, नई दिल्ली, 2013, पृष्ठ क्र. 30.



Scanned with CamScanner